15 OCT 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'स्टार्ट अप'मधून नवउद्योजक घडावेत

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबिरास प्रारंभ

**कोल्हापूर, ता. १४ :** 'स्टार्ट अप' शिबिरातून जिल्ह्यात अधिकाधिक नव उद्योजक घडावेत, अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे व्यक्त केली.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग आणि शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र स्टार्ट अप यात्रेच्या दुसऱ्या टप्प्यामधील जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबिर व सादरीकरण सत्राचे उद् घाटन आज झाले. त्यावेळी ते बोलत होते.

डॉ. शिर्के म्हणाले, 'नावीन्यपूर्ण संकल्पनांचा वापर करून स्टार्ट अप सुरू करण्यासाठी मानसिकता बदलणे गरजेचे आहे. समाजात आढळणाऱ्या बाबींकडे टीकात्मक नजरेतून न बघता त्यातून चांगला बदल घडवण्यासाठी प्रयत्न करावेत. यासाठी सर्वप्रथम मानसिकता बदलून सकारात्मक दृष्टिकोन ठेवून वाटचाल करावी. विद्यार्थ्यांनी मनातील नवसंकल्पनांना मूर्त स्वरुप देण्यासाठी प्रयत्न करावा. यासाठी विद्यापीठ सर्वतोपरी सहकार्य करेल.'

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, 'नवकल्पनांवर आधारित स्टार्ट अपमध्ये तरुणांचा सहभाग आवश्यक आहे.'

नव उद्योजक कृष्णराज महाडिक यांनी महाविद्यालयीन विद्यार्थी ते कार रेसर ते उद्योजक होईपर्यंतचा जीवन प्रवास उलगडला. सहायक संचालक संजय माळी यांनी उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या नवसंकल्पनांना जिल्हा व राज्यपातळीवर आकर्षक बक्षीस देण्यात येणार असल्याचे सांगितले. मानव्य विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता एम. एस. देशमुख, वाणिज्य शाखेचे अधिष्ठाता श्रीकृष्ण महाजन, तंत्रज्ञान विभागाचे संचालक प्रा. डॉ. एस. एन. सपली उपस्थित होते. रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रकाश राऊत यांनी आभार मानले.



**कोल्हापूर : महाराष्ट्र स्टार्ट अप यात्रेच्या दुसऱ्या टप्प्यामधील जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबिर व सादरीकरण सत्राचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. श्रीकृष्ण महाजन, प्रा. डॉ. एस. एन. सपली, डॉ. प्रकाश राऊत.**

15 OCT 2022
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'स्टार्टअप' शिबिरातून नवउद्योजक घडावेत

## कुलगुरू डॉ. शिर्के, तरुणांनी जिद्दीने वाटचाल करून यशस्वी उद्योजक बनावे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

तरुणांनी नावीन्यपूर्ण संकल्पनांचा उपयोग करून उद्योगनिर्मिती करताना अपयश आल्यास खचून न जाता जिद्दीने वाटचाल करून यशाच्या दिशेने पुढे जावे. प्रशासनातर्फे घेण्यात येणाऱ्या अशा 'स्टार्ट अप' शिबिरातून जिल्ह्यात अधिकाधिक नवउद्योजक घडावेत, अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग आणि शिवाजी विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र स्टार्टअप यात्रेच्या दुसऱ्या टप्प्यामधील जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबिर व सादरीकरण सत्राचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, नवकल्पनांवर आधारित स्टार्टअपमध्ये तरुणांचा सहभाग आवश्यक आहे. रस्त्यावरील पालापाचोळा, खराब प्लास्टिक अशा टाकाऊ वस्तूंचा वापर करून पर्यावरणपूरक नावीन्यपूर्ण संकल्पना राबवण्यासाठी विद्यापीठातील विद्यार्थी पुढे येत आहेत, ही बाब कौतुकास्पद आहे.



महाराष्ट्र स्टार्टअप यात्रेच्या प्रशिक्षण शिबिर व सादरीकरण सत्राच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डी. टी. शिर्के, कृष्णराज महाडिक आदी मान्यवर.

नवउद्योजक कृष्णराज महाडिक यांनी महाविद्यालयीन विद्यार्थी ते कार रेसर ते उद्योजक होईपर्यंतचा जीवन प्रवास उलगडून दाखवला.

प्रास्ताविक सहायक संचालक संजय माळी यांनी केले. कार्यक्रमास एम. एस. देशमुख, श्रीकृष्ण महाजन, डॉ. एस. एन. सपली आदी उपस्थित होते. आभार डॉ. प्रकाश राऊत यांनी मानले.

15 OCT 2022 सकाळ जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील डॉ. सचिन पाटील यांचे नेचांवर संशोधन

## प्राणघातक आजारांवर उपयोगी ; जमिनीची सुपीकता वाढून पीक जोमाने येण्यास मदत

**अमोल सावंत : सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १४ : मेसोझॉईक कालखंडात डायनोसॉर पृथ्वीवर सरपटत होते. ते नष्ट झाले. मात्र, या कालखंडातील नेचांच्या विविध प्रजातींनी तग धरत अस्तित्व आजही सिद्ध केले आहे. अवतीभवती, रानावनात, जंगलात, नदी, ओढे, झरे, शहरातील बागा, घरांच्या भिंतीवर, ड्रॉईंग रुममधील कुंडीत, लॉन गार्डनमध्ये, नर्सरीत असे नेचे दिसतात. बुकेंच्या सजावटीत नेचांच्या पानांमुळे वेगळीच नजाकत येते. प्राणघातक आजारांवर उपयोगी ठरणाऱ्या नेचांवर शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागात डॉ. सचिन पाटील यांनी संशोधन केले आहे.

जून ते डिसेंबर कालावधीत भरपूर पाऊस, कमी तापमानात ते येतात. नेचांची जपणूक, संवर्धन प्रत्येकाने करायला हवी, असे डॉ. पाटील यांनी सांगितले. उदरनिर्वाहासाठी नेचांच्या विविध प्रजातींचा वापर होतो. ॲंजिओप्टेरिस इव्हेक्टा, नेफ्रोलेपीस कॉर्डिफोलिया अशा नेचांची कोवळी पाने, खोड, मुळांचा पर्यायी अन्न म्हणून वापर केला जातो. जनावारांसाठी चारा म्हणूनही काही प्रजाती उपयुक्त आहेत. नेचांच्या मुळामध्ये सायनो बॅक्टेरिया (जीवाणू) असतात. हवेतील नायट्रोजनचे स्थिरिकरण हे जीवाणू करतात. त्यामुळे जमिनीची सुपीकता वाढते. पीक जोमाने येते.

### दृष्टिक्षेपात...

- पश्चिम घाट- १० नवीन प्रजातींची नोंद
- पश्चिम घाटात आढळतात- ११० प्रकार
- जिल्ह्यात आढळतात- ७० प्रकार

### 'फर्नरी'ची निर्मिती

नेचांचा अभ्यास, संशोधनासाठी डॉ. पाटील यांनी विद्यापीठात 'फर्नरी'ची निर्मिती केली आहे. यात ३० नेचांच्या प्रजाती जगविल्या आहेत. यातील काही नेचे सीलॉंग (अरुणाचल प्रदेश) येथून आणले आहेत.

### अशी आहे उपयुक्तता...

- नेचामध्ये ग्लायकोसाईडस्, फ्लॅव्होनॉईडस्, टर्पेनॉईडस्, अल्कलॉईडस् रसायने
- सेलाजिनेला ब्रायोप्टेरिस, लायकोपोडियम क्लॅव्हेंटम नेचाचा होमिओपॅथिक औषधात
- मेंदू, मेंदूशी संबंधित विकार, उष्माघातावर सेलाजिनेला ब्रायोप्टेरिस नेचा उपयुक्त
- मोरपंखी नेचा सर्पदंशावर उपयुक्त
- शरीरातील कफ पातळ करण्यासाठी औषध
- व्रण, जठरांचे आजार, पचनाचे आजार, लघवीच्या विकारांवर उपयुक्त

### पर्यावरण व्यवस्थापनात महत्त्व

औद्योगिकरण, शहरीकरणामुळे प्रदूषकांची निर्मिती होऊन हवा, पाणी, जमिनीचे प्रदूषण होते. अशी प्रदूषके नष्ट करण्यासाठी प्टेरिस व्हीटाटा, मार्सेलिया मिनुटा, इक्वीसेटम डेबिली, सॅल्वीनिया मोलेस्टा, ॲझोला पिनेटा प्रजातींचा वापर होतो. कर्करोग निर्माण करणारे आर्सेनिक, कॅडमियम, क्रोमीयम, पारा, तांबे धातू नेचे शोषूण घेतात.

**"डॉ. मीना डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखालील नेचांवर मी शोधप्रबंध पूर्ण केला. ऑफिओग्लॉसम गुजरातेन्स, ऑफिओग्लॉसम जयकृष्णी, ऑफिओग्लॉसम कोंकणेसी या प्रजातींचा मी शोध घेतला.**
**-प्रा. डॉ. सचिन पाटील**



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागाच्या मागील बाजूस फर्नरीची निर्मिती केली आहे.

लोकमत

# सिनेट निवडणुकीसाठी आजपासून अर्ज प्रक्रिया

## शिवाजी विद्यापीठ अधिसूचना प्रसिद्ध

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा अधिनियम, २०१६ नुसार शिवाजी विद्यापीठाची अधिसभा, विद्या परिषद आणि अभ्यास मंडळे या अधिकार मंडळांवर सदस्य निवडणुकीसाठीची अधिसूचना शुक्रवारी सायंकाळी प्रसिद्ध झाली. या निवडणुकीसाठी विविध संस्था, संघटनांच्या उमेदवारांची अर्ज भरण्याची प्रक्रिया आज, शनिवारपासून सुरू होईल. या निवडणुकीसाठी एकूण ४०,६०० जण मतदान करतील, असे सांगण्यात येते.

विद्यापीठ अधिसभा ३९, विद्या परिषदेच्या ८ आणि प्रत्येक अभ्यास मंडळावर ३ सदस्य याप्रमाणे निवड होणार आहे. या निवडीमध्ये अधिसभेवर प्राचार्य गट आणि शिक्षक गटातून प्रत्येकी १०, संस्था संचालकांमधून ६, विद्यापीठ अधिविभागातील शिक्षकांमधून ३ आणि नोंदणीकृत पदवीधरांमधून १० सदस्य निवडावयाचे आहेत.

विविध विषयांच्या अभ्यास मंडळांच्या गठणासाठी महाविद्यालयीन विभागप्रमुखांमधून प्रत्येक अभ्यास मंडळासाठी ३ सदस्य निवडावयाचे आहेत. विद्या परिषदेमध्ये प्रत्येक विद्याशाखेमधून २ शिक्षक निवडून द्यावयाचे आहेत. इच्छुक पात्र उमेदवारांना उमेदवारी अर्ज दि.२८ ऑक्टोबर सायंकाळी ५ वाजेपर्यंत भरता येतील.

विद्यापीठातील ग्राहक भांडार येथे उमेदवारी अर्ज उपलब्ध आहेत. निवडणुकांसाठी प्राप्त होणाऱ्या अर्जांची छाननी प्रक्रिया दि.३१ ऑक्टोबर रोजी होईल. दि.१ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत उमेदवारी मागे घेता येईल, असे निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी सांगितले.

पुढारी

# विद्यापीठ निवडणुकीची आजपासून रणधुमाळी

## निवडणूक अधिसूचना प्रसिद्ध; आजपासून अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा अधिनियमानुसार शिवाजी विद्यापीठाची अधिसभा, विद्या परिषद व अभ्यास मंडळे या अधिकार मंडळांवर सदस्य निवडणुकीसाठीची अधिसूचना शुक्रवारी प्रसिद्ध झाली.

विद्यापीठ निवडणुकीसाठी विद्यापीठ विकास आघाडी, विद्यापीठ विकास मंच, 'सुटा', आजी-माजी विद्यार्थी कृती समितीने निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. राखीव प्रवर्गाच्या आरक्षणाची सोडत १३ ऑक्टोबर रोजी काढण्यात आली. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेसाठी १ खुला व १ अनुसूचित जमाती, वाणिज्य आणि व्यवस्थापन १ खुला महिला आणि १ डीटीएनटी प्रवर्ग, मानव्यशास्त्र विद्याशाखा १ खुला व १ अनुसूचित जातीसाठी, तर आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा खुला १ आणि इतर मागासवर्गीय १ असे प्रवर्ग निश्चित झाले आहेत.

इच्छुक पात्र उमेदवारांना अधिसूचना जाहीर झाल्यापासून उमेदवारी अर्ज २८ ऑक्टोबरपर्यंत सायंकाळी ५ वाजेपर्यंत भरता येतील. शिवाजी विद्यापीठातील ग्राहक भांडार येथे उमेदवारी अर्ज उपलब्ध असणार आहेत.

निवडणुकीसाठी प्राप्त अर्जांची छाननीची प्रक्रिया ३१ ऑक्टोबर रोजी होईल. १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत उमेदवारी मागे घेण्याची मुदत आहे. निवडणुकीसाठी संस्थाचालक ११६, महाविद्यालयीन शिक्षक २,९४५, विद्यापीठ शिक्षक १६६, नोंदणीकृत पदवीधर ३६,३४३, प्राचार्य ९३ व विभागप्रमुख ९३७ मतदार मतदान करतील. निश्चित केलेल्या मतदान केंद्रांवर मतदान १४ नोव्हेंबर रोजी होईल. मतमोजणी १६ नोव्हेंबर रोजी विद्यापीठ कार्यालयात होईल, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठ निवडणुकींतर्गत अधिसभा ३९, विद्या परिषद ८ व प्रत्येक अभ्यास मंडळ ३ सदस्य याप्रमाणे निवड होणार आहे. अधिसभेवर प्राचार्य गट १०, शिक्षक गट १०, संस्था संचालक ६, विद्यापीठ अधिविभाग शिक्षकांमधून ३ व नोंदणीकृत पदवीधरांमधून १० सदस्य निवडले जाणार आहेत. विविध विषयांच्या अभ्यास मंडळांसाठी महाविद्यालयीन विभागप्रमुखांमधून प्रत्येक अभ्यास मंडळासाठी ३ सदस्य निवडले जातील. विद्या परिषदेमध्ये प्रत्येक विद्याशाखेमधून २ शिक्षक निवडून दिले जाणार आहेत.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ : उमेदवारी अर्ज भरण्यास आजपासून प्रारंभ

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाची अधिसभा, विद्या परिषद आणि अभ्यास मंडळे या अधिकार मंडळांवर सदस्य निवडणुकीसाठीची अधिसूचना शुक्रवारी प्रसिद्ध करण्यात आली. मतदान दि. १४, तर मतमोजणी १६ नोव्हेंबर रोजी होईल, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.

सिनेट निवडणुकीमध्ये अधिसभा ३९, विद्या परिषदेच्या ८ आणि प्रत्येक अभ्यास मंडळावर ३ सदस्यांची निवड केली जाणार आहे. या निवडीमध्ये अधिसभेवर प्राचार्य गटातून १०, शिक्षक गटातून १०, संस्था संचालकांमधून ६, विद्यापीठ अधिविभागातील शिक्षकांमधून ३ आणि नोंदणीकृत पदवीधरांमधून १० सदस्य निवडण्यात येणार आहेत, तसेच विविध विषयांच्या अभ्यास मंडळांच्या गठणासाठी महाविद्यालयीन विभागप्रमुखांमधून प्रत्येक अभ्यास मंडळासाठी ३ सदस्य निवडायचे आहेत.

विद्या परिषदेमध्ये प्रत्येक विद्याशाखेमधून २ शिक्षक निवडून



द्यायचे आहेत. यातील राखीव प्रवर्गाच्या आरक्षणाची सोडत दि. १३ ऑक्टोबर रोजी काढण्यात आली. त्यानुसार विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेसाठी १ खुला आणि १ अनुसूचित जमाती, वाणिज्य आणि व्यवस्थापन १ खुला महिला आणि १ डीटीएनटी प्रवर्ग, मानव्यशास्त्र विद्याशाखा १ खुला व १ अनुसूचित जातीसाठी, तर आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा-खुला १ आणि इतर मागासवर्गीय १ असे प्रवर्ग निश्चित झाले आहेत. उमेदवारांना दि. १५ ते दि. २८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येतील. शिवाजी विद्यापीठातील ग्राहक भांडार येथे उमेदवारी अर्ज उपलब्ध आहेत. निवडणुकीसाठी संस्थाचालक ११६, महाविद्यालयीन शिक्षक २९४५, विद्यापीठ शिक्षक १६६, नोंदणीकृत पदवीधर ३६ हजार ३४३, प्राचार्य ९३ व विभागप्रमुख ९३७ मतदार मतदान करतील.

15 OCT 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विविध अधिकार मंडळांच्या निवडणुका जाहीर

**कोल्हापूर, ता. १४ :** शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला. १४ नोव्हेंबरला मतदान, तर १६ ला मतमोजणी होईल. उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम मुदत २८ ऑक्टोबर सायंकाळी पाचपर्यंत आहे.

## प्रक्रिया अशी...



- **अर्ज भरणे**- १४ ते २८ ऑक्टोबर
- **अर्ज छाननी** - ३१ ऑक्टोबर
- **अर्ज माघार** - १ नोव्हेंबरला सायंकाळी पाचपर्यंत
- **मतदान**- १४ नोव्हेंबर
- **मतमोजणी**- १६ नोव्हेंबर

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायद्यानुसार अधिसभा, विद्या परिषद व अभ्यास मंडळांसाठी निवडणूक होत आहे. अधिसभा ३९, विद्या परिषदेच्या आठ आणि प्रत्येक अभ्यास मंडळावर तीन सदस्य याप्रमाणे निवड होणार आहे. यात अधिसभेवर प्राचार्य गटातून १०, शिक्षक गटातून १०, संस्था संचालकांमधून सहा, विद्यापीठ अधिविभागातील शिक्षकांमधून तीन आणि नोंदणीकृत पदवीधरांमधून १० सदस्य निवडले जातील. विविध विषयांच्या अभ्यास मंडळांच्या गठणासाठी महाविद्यालयीन विभागप्रमुखांमधून प्रत्येक अभ्यास मंडळासाठी तीन सदस्य निवडावयाचे आहेत.

विद्या परिषदेत प्रत्येक विद्याशाखेतून दोन शिक्षक निवडून द्यावयाचे आहेत. यातील राखीव प्रवर्गाच्या आरक्षणाची सोडत १३ ऑक्टोबरला काढण्यात आली. त्यानुसार, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेसाठी एक खुला आणि एक अनुसूचित जमाती, वाणिज्य आणि व्यवस्थापन एक खुला महिला आणि एक डीटीएनटी प्रवर्ग, मानव्यशास्त्र विद्याशाखा एक खुला व एक अनुसूचित जातीसाठी, तर आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा-खुला एक आणि इतर मागासवर्गीय एक असे प्रवर्ग निश्चित झाले आहेत. निवडणुकीसाठी संस्थाचालक ११६, महाविद्यालयीन शिक्षक दोन हजार ९४५, विद्यापीठ शिक्षक १६६, नोंदणीकृत पदवीधर ३६ हजार ३४३, प्राचार्य ९३ व विभागप्रमुख ९३७ मतदार मतदान करतील.

15 OCT 2022 तरूण भारत


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ निवडणुकीची अधिसूचना जाहीर

## आजपासून उमेदवारी अर्ज भरण्यास प्रारंभ : १४ नोव्हेंबरला मतदान, १६ रोजी होणार मतमोजणी

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाची अधिसभा, विद्या परिषद आणि अभ्यास मंडळ या अधिकार मंडळांवर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे कायदा अधिनियम, २०१६ नुसार सदस्य निवडणुकीसाठीची अधिसूचना शुक्रवारी विद्यापीठाने जाहीर केली आहे. या अधिसूचनेप्रमाणेच अधिसभेच्या ३९, विद्या परिषदेच्या ८ आणि प्रत्येक अभ्यास मंडळावर ३ सदस्यांची निवड केली जाणार आहे. निवडीसाठी अधिसभेवर प्राचार्य व शिक्षक गटातून प्रत्येकी १०, संस्था संचालकांमधून ६, विद्यापीठ अधिविभागातील शिक्षकांमधून



३ आणि नोंदणीकृत पदवीधरांमधून १० संदस्य निवड करावी लागणार आहे.

विद्या परिषदेमध्ये प्रत्येक विद्याशाखेमधून २ शिक्षक निवडून द्यावयाचे आहेत. यातील राखीव प्रवर्गाच्या आरक्षणाची सोडत काल गुरुवारी काढली होती. त्यानुसार, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेसाठी १ खुला आणि १ अनुसूचित जमाती, वाणिज्य आणि व्यवस्थापन १ खुला महिला आणि १ डीटीएनटी प्रवर्ग, मानव्यशास्त्र विद्याशाखा १ खुला व १ अनुसूचित जातीसाठी तर आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा– खुला १ आणि इतर मागासवर्गीय १ असे प्रवर्ग निश्चित केले आहेत.

इच्छुक पात्र उमेदवारांना अधिसूचना शनिवार, १५ पासून उमेदवारी अर्ज भरता येईल. २८ ऑक्टोबर रोजीच्या सायंकाळी ५ वाजेपर्यंत अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु राहिल. शिवाजी विद्यापीठातील ग्राहक भांडारमध्ये अर्ज उपलब्ध आहेत. तसेच निवडणुकांसाठी भरल्या जाणाऱ्या अर्जांची छाननी सोमवार, ३१ रोजी केली जाईल. तसेच १ नोव्हेंबरला सायंकाळी ५ वाजेपर्यंत उमेदवारी मागे घेता येईल.

निवडणुकीसाठी ११६ संस्थाचालक, ९३ प्राचार्य, २९४५ महाविद्यालयीन शिक्षक, १६६ विद्यापीठ शिक्षक, ३६ हजार ३४३ नोंदणीकृत पदवीधर, ९३७ विभागप्रमुख मतदानाचा हक्क बजावणार आहेत. या मतदारांना नियोजित केलेल्या केंद्रावर १४ नोव्हेंबरला मतदान करणार करता येईल. एक दिवसाच्या खंडानंतर म्हणजे १६ नोव्हेंबरला शिवाजी विद्यापीठाच्या कार्यालयात मतमोजणी केली जाईल, असे निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रभारी कुलसचिवांनी कळविले आहे.

सकाळ

# दूरशिक्षण केंद्रातर्फे एम.बी.ए. फेरप्रवेशाला मुदत वाढ

**कोल्हापूर, ता. १४ :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे एम.बी.ए. (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमासाठी चालू शैक्षणिक वर्षासाठी विद्यापीठाने घेतलेल्या प्रवेश परीक्षेनुसार प्रक्रिया झालेली आहे. तथापि विद्यार्थी हितासाठी फेर प्रवेश परीक्षेचे आयोजन केले आहे, असे उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे यांनी सांगितले. ते म्हणाले की, एम. बी. ए. अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्रज्ञान शिक्षण परिषद यांची मान्यता आहे. त्यामुळे अभ्यासार्थींना मार्केटिंग, मानवी संसाधन व्यवस्थापन, ऑपरेशन आणि प्रोडक्टशन व्यवस्थापन तसेच वित्तीय व्यवस्थापन या विषयातून एम.बी.ए. (डिस्टन्स मोड) पूर्ण करता येणार आहे. विद्यार्थी, नोकरदार, गृहिणी, उद्योजक, व्यवसायिक आदी हा अभ्यासक्रम पूर्ण करू शकतात. इच्छुकांनी २० ऑक्टोबरपर्यंत प्रवेश परीक्षा अर्ज भरावेत. ३० ऑक्टोबरला प्रवेश परीक्षा आहे. जास्तीत जास्त विद्यार्थांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी केले.

15 OCT 2022 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अत्रे प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांची खांडेकर स्मृती संग्रहालयास भेट

कोल्हापूर, ता. १४ : पुरंदर (जि. पुणे) येथील आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानतर्फे 'साहित्यिकांच्या गावा' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्याचाच भाग म्हणून प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय कोलते व संचालकांनी शिवाजी विद्यापीठातील वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालयास आज भेट दिली. कोलते यांनी प्रतिष्ठानच्या उपक्रमांची माहिती दिली.

ते म्हणाले, ''प्रतिष्ठानची स्थापना ३७ वर्षांपूर्वी झाली. ज्येष्ठ नेते शरद पवार प्रतिष्ठानचे संस्थापक आहेत. कै. अत्रे यांच्या स्मृतिनिमित्त दरवर्षी दोन दिवसीय साहित्य संमेलन भरवले जाते. विविध पुरस्कार दिले जातात. वाचनालय चालवले जाते. अत्रे यांच्या कर्तृत्वाचा आढावा घेणारी व्याख्याने घेतली जात आहेत. अत्रे लिखित 'कऱ्हेचे पाणी' या आत्मचरित्राचे पाच खंडांचे संक्षिप्त पुस्तक प्रतिष्ठानतर्फे प्रकाशित होणार आहे. मोरूची मावशी, तो मी नव्हेच, लग्नाची बेडी या नाटकांचे प्रयोग राज्यभरात व्हावेत, यासाठीही पाठपुरावा सुरू आहे. या सर्व सांस्कृतिक उपक्रमांचा भाग म्हणून यंदा प्रतिष्ठानने साहित्यिकांच्या गावाला भेट देत आहे. कऱ्हाड येथे ज्येष्ठ नेते साहित्यिक यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृती स्थळी भेट देऊन सर्वजण कोल्हापुरात आले. विद्यापीठातील वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालयास भेट दिली. उद्या शनिवारी मालगुंड (जि. रत्नागिरी) येथे कवी केशवसुत यांच्या स्मारकाला भेट देणार आहेत.''

Times of India

# Start-up yatra at SUK gets good response

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur**: The Maharashtra start-up festival was organised at the Shivaji University, Kolhapur, (SUK) on Friday to find the best start-up ideas and to promote them.

Three best start-up ideas from the district were selected by expert examiners from various fields depending upon the innovative concept. They will be forwarded for state level competition to be held on October 17 in Mumbai. Prizes of Rs 25,000, Rs 15,000 and Rs 10,000 were declared for the winners and the distribution of awards will take place by Governor of Maharashtra Bhagat Singh Koshyari.

Vice-Chancellor of SUK inaugurated the second phase of Maharashtra start-up yatra's district-level training camp and presentation session on Friday morning. The event was jointly organised by state governments skills, employment, entrepreneurship and innovation department along with the SUK. Authorities from the SUK, district administration, as well as department heads, professors, entrepreneurs implementing innovative concepts and students were present for the event held in Humanities department at SUK premises.

V-C Dr. D.T. Shirke said, "It is necessary to change the mindset to start a start-up using innovative concepts. Instead of looking at the issues in the society with a critics eye, efforts should be made to bring about a good change."